# Anti-Ragging Policy

**Introduction:**

HPT Arts & RYK Science College, Nashik is committed to providing a safe and respectful learning environment for all students. Ragging, in any form, is strictly prohibited and will not be tolerated. This policy aims to prevent and address ragging incidents, ensuring a conducive and inclusive atmosphere for academic growth and personal development.

**Definition of Ragging:**

Ragging is any act of physical or mental abuse, harassment, intimidation, or bullying of a student by another student or group of students, which may cause physical or emotional harm, or create a hostile environment.

**Objectives:**

1. To prevent ragging in all its forms and promote a culture of respect, empathy, and inclusivity among students.
2. To provide a safe and supportive environment for students to pursue their academic and extracurricular activities without fear of harassment or intimidation.
3. To ensure that all students are treated with dignity and respect, regardless of their background, caste, creed, religion, gender, or any other characteristic.

**Prohibited Acts:**

The following acts are strictly prohibited and will be considered as ragging:

1. Physical abuse, including pushing, hitting, or any form of physical violence.
2. Verbal abuse, including name-calling, insults, or derogatory remarks.
3. Mental harassment, including threats, intimidation, or bullying.
4. Forcing students to perform tasks that are humiliating, degrading, or against their will.
5. Any act that creates a hostile or intimidating environment, including but not limited to, teasing, mocking, or ridiculing.

**Consequences of Ragging:**

Any student found guilty of ragging will face disciplinary action, which may include:

1. Warning and counselling.
2. Suspension from classes or hostel for a specified period.
3. Expulsion from the college.
4. Fines or penalties.
5. Reporting to the police, if necessary.

**Preventive Measures:**

To prevent ragging, the college will:

1. Conduct awareness through induction programs, workshops and extra-curricular activities
2. Make students conscious about the consequences of ragging and the importance of maintaining a respectful environment.
3. Establish Anti-Ragging Committee to monitor and address ragging incidents.
4. Provide counselling and support services to students who are victims of ragging.
5. Ensure that all students are aware of the anti-ragging policy and the consequences of violating it.
6. Encourage students to report incidents of ragging to the authorities without fear of retaliation.
7. Make all stakeholders aware about rules and regulations prepared by UGC and Govt. of Maharashtra in this regard.
8. Obtain Anti-Ragging affidavits from students and parents at the time of admission

**Reporting and Redressal:**

Students who are victims of ragging or witness ragging incidents are encouraged to report them to:

1. The Anti-Ragging Committee.
2. Vice-Principals and Heads of Dept.
3. The Principal.

All complaints will be treated confidentially and investigated promptly. The college will take necessary action to address the complaint and provide support to the affected student.

**Review and Revision:**

This policy will be reviewed and revised annually, or as needed, to ensure its effectiveness in preventing and addressing ragging incidents. The present policy is revised on 1 June 2024.

**Acknowledgement:**

All students, faculty members, and staff are expected to acknowledge and abide by this anti-ragging policy. By enrolling in the college, students agree to comply with this policy and respect the rights and dignity of their peers.

**Dr. V. N. Suryawanshi**

(Principal)

# MAHARASHTRA PROHIBITION OF RAGGING ACT, 1999[1]

**MAHARASHTRA ACT NO. XXXIII OF 1999**

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 15th May, 1999.*

An Act to prohibit ragging in educational institutions in the State of Maharashtra.

WHEREAS it is expedient to enact a special law to prohibit ragging in educational institutions in the State of Maharashtra; It is hereby enacted in the Fiftieth Year of the Republic of India as follows :-

**1. Short title and commencement.**- (1) This Act may be called the Maharashtra Prohibition of Ragging Act, 1999.

(2) It shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.

**2. Definitions.**- In this Act, unless the context otherwise requires,-

(a) "educational institution" means and includes a college, or other institution by whatever name called, carrying on the activity or imparting education therein (either exclusively or among other activities); and includes an orphanage or a boarding home or hostel or a tutorial institution or any other premises attached thereto;

(b) "head of the educational institution" means the Vice-Chancellor of the University, Dean of Medical Faculty, Director of the Institution or the Principal, Headmaster or the person responsible for the management of the educational institution;

(c) "ragging" means display of disorderly conduct, doing of any act which causes or is likely to cause physical or psychological harm or raise apprehension or fear or shame or embarrassment to a student in any educational institution and includes -

(i) teasing, abusing, threatening or playing practical jokes on, or causing hurt to, such student; or

(ii) asking a student to do any act or perform something which such student will not, in the ordinary course, willingly, do.

**3. Prohibition of ragging.**- Ragging within or outside of any educational institution is prohibited.

**4. Penalty for ragging.**- Whoever directly or indirectly commits, participates in, abets or propagates ragging within or outside any educational institution, shall, on conviction, be punished with imprisonment for a term which may extend to two years and shall also be liable to a fine which may extend to ten thousand rupees.

1. M. G. G. dated 15.5.1999Pt. VIII, p. 666.

**5. Dismissal of student.-** Any student convicted of an offence under section 4 shall be dismissed from the educational institution and such student shall not be admitted in any other educational institution for a period of five years from the date of order of such dismissal.

**6. Suspension of student.-** (1) Whenever any student or, as the case may be, the parent or guardian, or a teacher of an educational institution complaints, in writing, of ragging to the head of the educational institution, the head of that educational institution shall, without prejudice to the foregoing provisions, within seven days of the receipt of the complaint, enquire into the matter mentioned in the complaint and if, *prima facie*, it is found true, suspend the student who is accused of the offence, and shall, immediately forward the complaint to the police station having jurisdiction over the area in which the educational institution is situated, for further action.

(2) Where, on enquiry by the head of the educational institution, it is proved that there is no substance, *prima facie*, in the complaint received under sub-section (1), he shall intimate the fact, in writing, to the complainant.

(3) The decision of the head of the educational institution that the student has indulged in ragging under sub-section (1), shall be final.

**7. Deemed abatment.-** If the head of the educational institution fails or neglects to take action in the manner specified in section 6 when a complaint of ragging is made, such person shall be deemed to have abetted the offence of ragging and shall, on conviction, be punished as provided for in section 4.

**8. Power to make rules.-** (1) The State Government may, by notification in the *Official Gazette*, make rules for carrying out all or any of the purposes of this Act.

(2) Every rule made under this Act shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature, while it is in session for a total period of thirty days, which may be comprised in one session or in two or more successive sessions, and if, before the expiry of the session in which it is so laid or the session immediately following, both Houses agree in making any modification in the rules or both Houses agree that the rule should not be made, and notify such decision in the *Official Gazette*, the rule shall, from the date of publication of such notification, have effect only in such modified form or be of no effect, as the case may be; so however, that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done or omitted to be done under that rule.

---

असा क्र. ४२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, मे १५, १९९९/वैशाख २५, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.—महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग करण्यास मनाई करण्याकरिता अधिनियम .. | ४४९–४५१ |

दिनांक १३ मे १९९९ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

### सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

[राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १५ मे १९९९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग करण्यास मनाई करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात, शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग करण्यास मनाई करण्यासाठी एक विशेष कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र रॅगिंग करण्यास मनाई करणे अधिनियम, १९९९ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "शैक्षणिक संस्था" याचा अर्थ तीमध्ये शिक्षण देण्याचे (केवळ तेच किंवा इतर कार्याबरोबर) कार्य करणारे महाविद्यालय, किंवा कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी अन्य संस्था असा आहे आणि त्यात त्यांचा समावेश होतो ; आणि तिच्याशी संलग्न असलेले अनाथालय, निवासगृह किंवा वसतिगृह किंवा पाठनिर्देश संस्था किंवा कोणतीही अन्य जागा यांचा त्यात समावेश होतो ;

(ख) "शैक्षणिक संस्थेचा प्रमुख" याचा अर्थ विद्यापीठाचा कुलगुरु, वैद्यक विद्याशाखेचा अधिष्ठाता, संस्थेचा संचालक किंवा प्राचार्य, मुख्याध्यापक किंवा शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनास जबाबदार असणारी व्यक्ती असा आहे ;

(ग) "रॅगिंग" या संज्ञेचा अर्थ, ज्यामुळे कोणत्याही शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यास शारीरिक किंवा मानसिक हानी पोहोचत असेल किंवा पोहोचण्याची शक्यता असेल किंवा त्याच्यात धास्तीची किंवा भयाची अथवा लज्जेची किंवा अडचणीत आल्याची भावना निर्माण होत असेल असे गैरवर्तणुकीचे प्रदर्शन करणे किंवा असे कोणतेही कृत्य करणे असा आहे आणि त्यामध्ये, पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(एक) अशा विद्यार्थ्याला चिडवणे, शिवीगाळ करणे, धमकी देणे किंवा त्याच्या खोड्या काढणे, किंवा मनाला टोचेल असे बोलणे ; किंवा

(दोन) असा विद्यार्थी, सर्वसामान्यपणे जे कृत्य किंवा जी गोष्ट स्वेच्छेने करणार नाही असे कृत्य किंवा अशी गोष्ट त्यास करावयास सांगणे.

रॅगिंग करण्यास मनाई. ३. कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये किंवा तिच्या बाहेर रॅगिंग करण्यास मनाई आहे.

रॅगिंग करण्याबद्दल शास्ती. ४. जो कोणी, कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये किंवा तिच्याबाहेर प्रत्यक्ष रीत्या किंवा अप्रत्यक्ष रीत्या रॅगिंग करत असेल, त्यात भाग घेत असेल, त्यास अपप्रेरणा देत असेल, किंवा त्याचा प्रचार करत असेल तर, त्यास अपराधसिद्धीनंतर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची देखील शिक्षा होण्यास तो पात्र असेल.

विद्यार्थ्याला काढून टाकणे. ५. कलम ४ खालील अपराधाबद्दल सिद्धापराधी ठरलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास शैक्षणिक संस्थेतून काढून टाकण्यात येईल आणि अशाप्रकारे काढून टाकण्यात आल्याच्या आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता कोणत्याही इतर शैक्षणिक संस्थेमध्ये अशा विद्यार्थ्यास प्रवेश देण्यात येणार नाही.

विद्यार्थ्याला निलंबित करणे. ६. (१) जेव्हा कोणताही विद्यार्थी किंवा यथास्थिति, आई-वडिल किंवा पालक, किंवा शैक्षणिक संस्थेचा शिक्षक, शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाकडे रॅगिंगची लेखी तक्रार करील तर, त्या शैक्षणिक संस्थेचा प्रमुख, पूर्वगामी तरतुदींना बाध न आणता, तक्रार मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत तक्रारीमध्ये नमूद केलेल्या प्रकरणाची चौकशी करील आणि जर, प्रथमदर्शनी, ती खरी असल्याचे आढळून आल्यास, अपराधाचा आरोप असलेल्या विद्यार्थ्याला निलंबित करील आणि ती शैक्षणिक संस्था ज्या क्षेत्रामध्ये असेल त्या क्षेत्रावर अधिकारिता असलेल्या पोलीस ठाण्याकडे तक्रार पुढील कार्यवाहीसाठी त्वरित पाठवील.

(२) ज्या बाबतीत पोट-कलम (१) अन्वये मिळालेल्या तक्रारीमध्ये, प्रथमदर्शनी काही तथ्य नसल्याचे, शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने केलेल्या चौकशीनंतर सिद्ध झाल्यास, तो, तक्रारदाराला वस्तुस्थितीबाबत लेखी कळवील.

(३) पोट-कलम (१) अन्वये शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने, विद्यार्थ्यांचा रॅगिंगमध्ये सहभाग आहे असा दिलेला निर्णय अंतिम असेल.

७. रॅगिंगची तक्रार केली असताना, शैक्षणिक संस्थेचा प्रमुख कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने कारवाई करण्यात कसूर किंवा हयगय करील तर, रॅगिंग सारख्या अपराधाला अशा व्यक्तीने अपप्रेरणा दिल्याचे मानले जाईल आणि अपराधसिद्धिनंतर कलम ४ मध्ये तरतूद केल्या-प्रमाणे तिला शिक्षा करण्यात येईल. अपप्रेरणा दिल्याचे मानणे.

८. (१) राज्य शासनास या अधिनियमाची सर्व किंवा कोणतीही प्रयोजने पार पाडण्यासाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्या-पूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे निर्णय घेतील तर, असा निर्णय राजपत्रात अशा निर्णयाबद्दलची अधि-सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति मुळीच अंमलात येणार नाही तथापि, असा फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करावयाचे राहिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.